डॉ. विनायक राऊत यांनी या वगनाट्यातील कथानक, पात्रे, रसनिर्मिती, भाषाशैली, संवाद, विनोद, परिणामकारकता, या वगनाट्याचे रंगभूमीवरील स्थान, रंजनशीलता, प्रयोगक्षमता कलाकार सापेक्षता अशा विविध निकषांच्या आधारे परीक्षण करून काही निरीक्षणे नोंदवलेली आहेत. त्यातील ‘एखाद्या नाट्यकृतीला लोकप्रियता प्राप्त होण्यासाठी, रसिक प्रेक्षकांच्या मनावर त्या नाट्यकृतीची भुरळ पडण्यासाठी अनेक गोष्टी कारणीभूत ठरतात. मिळालेली लोकप्रियता टिकवून ठेवणे ही लोकप्रियता प्राप्त करण्यापेक्षा अवघड गोष्ट. पण ‘गाढवाचं लग्न’ या वगनाट्याने या दोन्ही गोष्टी साध्य केल्या. त्या साध्य करण्यापाठीमागे कथानक, व्यक्तिरेखा, संघर्ष, रसनिर्मिती, कालसापेक्षता अशा अनेक कारणांचा मोलाचा वाटा असतो. या सर्व गोष्टींच्या यशस्वीतेवर नाट्यकृतीचे यश अवलंबून असते. प्रस्तुत ‘गाढवाचं लग्न’ या वगनाट्यामध्ये या सर्वच गोष्टींचा सुंदर मिलाप घडून आला आणि या वगनाट्याने लोकरंगभूमीवर अमाप यश प्राप्त केले. हे डॉ. राऊत यांचे निरीक्षण या वगनाट्याकडे पाहण्याची एक नवी दृष्टी देणारे आहे. वगनाट्यातील कलाविष्कार, त्यातून घडविलेले समाजदर्शन अशा विविध पैलूंचे दर्शन घडवून या वगनाट्याची मौलिकता नेमकी कोणत्या स्वरुपाची आहे याचे अभ्यासपूर्ण दर्शन या ग्रंथात घडविलेले आहे.

वेदिका प्रकाशन
vedikabookstores.com
Mob. 9730706160
उदगीर, लातूर, महाराष्ट्र –४१३५१७

ISBN : 978-81-69298-13-1
9 788169 298131

₹ 150/-

# ‘गाढवाचं लग्न’ रंगभूमीवरील एक अजरामर प्रवास

डॉ. विनायक शरदचंद्र राऊत

